**वाहतुक शाखा, पुणे शहर**
**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे**

**जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./ ६237/२०२३** **दिनांक :- 31/०८/२०२३**

## <u>प्रेसनोट</u>

पुणे शहरातील खडकी वाहतुक विभागाचे हद्दीत महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लि. यांचेतर्फे मेट्रोचे काम सुरु असुन त्याकरीता बोपोडी चौक ते चर्च चौक दरम्यान एकेरी मार्ग करण्यात आला आहे. त्यामुळे वाहनचालकांची मोठया प्रमाणात गैरसोय होत असून खडकी बाजार परिसरामध्ये मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्याचे दिसून येत आहे. सद्यस्थितीत मेट्रोचे काम ब-यापैकी पुर्ण झाले असल्याने वाहनचालकांची गैरसोय टाळणेकरीता सदर ठिकाणचे वाहतूकीत बदल करणे गरजेचे असल्याने महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही. ए.०१९६/८७१/ सीआर-३७/टीआरए-२, दिनांक २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी रोहिदास पवार, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय, अतिरिक्त कार्यभार पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, खडकी वाहतूक विभागातील बोपोडी चौक ते चर्च चौक दरम्यान प्रवास करणा-या दुचाकी, तीनचाकी व हलक्या चारचाकी वाहनांकरीता **<u>दि. ०१/०९/२०२३ ते दि. १५/०९/२०२३ रोजीपर्यंत प्रायोगिक तत्वावर खालीलप्रमाणे</u>** मार्ग वापरण्यास परवानगी देण्यात येत आहे.

### खडकी वाहतूक विभाग पुणे अंतर्गत

- ➤ बोपोडी चौकामधुन शिवाजीनगरकडे जाणा-या **दुचाकी, तीनचाकी व हलक्या चारचाकी** वाहनचालकांना बोपोडी चौक, सरळ खडकी रेल्वेस्टेशन, सी.एफ.व्ही.डी. (फुटबॉल मैदान) येथून डावीकडे वळण घेवून सरळ ऑर्डन्स फॅक्टरी हॉस्पीटल समोरुन उजवीकडे वळण घेवून संविधान चौक (चर्च चौक) येथून इच्छितस्थळी जावे.
- ➤ खडकी बाजारातून पिंपरी चिंचवडकडे जाणा-या **दुचाकी, तीनचाकी व हलक्या चारचाकी** वाहनचालकांनी संताजी घोरपडे मार्गावरुन सी.एफ.व्ही.डी. चौकामध्ये येवून उजवीकडे वळण घेवून इच्छितस्थळी जावे.

( रोहिदास पवार )
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय,
अतिरिक्त कार्यभार,
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर